शाळेतून लवकर जाण्यासाठीची कार्यपद्धती

प्रिय पालकहो,

सप्रेम नमस्कार!

आजारीपणामुळे किंवा विद्यार्थ्याला शाळेतून लवकर जाण्याची आवश्यकता भासणाऱ्या इतर कोणत्याही कारणामुळे शाळेतून लवकर जाण्याच्या संदर्भात विद्यार्थ्यांची सुरक्षितता व कल्याण सुनिश्चित करण्यासाठी खालील महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचनांकडे कृपया आपले लक्ष द्यावे.

1. आपल्या मुलाला/मुलीला अगदी थोडेसेही अस्वस्थ वाटत असल्यास, डॉक्टरांची भेट ठरलेली असल्यास किंवा इतर कोणत्याही पूर्वनियोजित कारणामुळे विद्यार्थ्याला शाळेतून लवकर जावे लागणार असल्यास, त्याला/तिला शाळेत पाठवू नये, अशी आमची ठाम शिफारस व विनंती आहे. विद्यार्थ्याची सुरक्षितता आणि शाळेचे सुरळीत कामकाज सुनिश्चित करण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.

2. शाळेतून लवकर जाणे: आपल्या पाल्याला अत्यंत तातडीच्या परिस्थितीत शाळेतून लवकर घेऊन जाणे आवश्यक असल्यास, पालकांनी स्वतः शाळेत येऊन त्याला/तिला घेऊन जावे.

3. प्रक्रिया: पालकांना शाळेत येणे शक्य नसल्यास, खाली दिलेल्या नमुन्यानुसार अधिकृत व्यक्तीमार्फत शाळेच्या रिसेप्शनला संदेश पाठवणे आवश्यक आहे.

4. कृपया खाली दिलेला संदेशाचा नमुना कॉपी-पेस्ट करा:

“मी, [पालकांचे पूर्ण नाव], [इयत्ता] मध्ये शिकणाऱ्या [मुलाचे/मुलीचे पूर्ण नाव] यांचा/यांची पालक आहे. आज, [दिनांक] रोजी, [कारण] यामुळे माझ्या मुलाला/मुलीला शाळेतून घेऊन जाण्यासाठी [मुलाला घेऊन येणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव व फोन नंबर], [नाते] यांना मी परवानगी देत आहे. मला स्वतःला येणे शक्य नसल्यामुळे, माझ्या मुलाला/मुलीला संबंधित व्यक्तीच्या ताब्यात दिल्यानंतर त्याच्या/तिच्या सुरक्षिततेची

जबाबदारी शाळेची राहणार नाही, याची मला पूर्ण जाणीव असून मी हे समजून घेतले आहे." माझा फोन नंबर __________.

5. संबंधित व्यक्तीने मुलाला/मुलीला शाळेतून जाण्याची परवानगी मिळण्यापूर्वी पडताळणीसाठी शाळेच्या गेटवर आणि रिसेप्शनवर आपले वैध ओळखपत्र व आपला संदेश सादर करणे आवश्यक आहे. रिसेप्शनकडून पालकांना व्हिडिओ कॉलद्वारे देखील पडताळणी केली जाईल.

6. कृपया नोंद घ्यावी: पालक/पालकप्रतिनिधी शाळेत आल्यानंतर ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्यांना किमान 30 ते 45 मिनिटे प्रतीक्षा करावी लागू शकते.

7. पालकांनी वरील नमुन्यानुसार स्वाक्षरी केलेली लेखी प्रत पुढील दिवशी शाळेत जमा करणे आवश्यक आहे.

आपल्याला याव्दारे कळविण्यात येते की, शाळेच्या सर्व अधिकृत सूचना आणि महत्वाची माहिती वर्गाच्या WhatsApp गटांद्वारे कळविली जाईल. तथापि, नेटवर्कच्या समस्या किंवा इतर तांत्रिक कारणांमुळे WhatsApp संदेश उशिरा मिळू शकतात किंवा मिळणारही नाहीत. शाळेची वेबसाइट नेहमीच नवीनतम माहितीसह अद्ययावत केली जाते. त्यामुळे पालकांनी शाळेची वेबसाइट नियमितपणे तपासावी व तिचा संदर्भ घ्यावा.

कोणताही संभ्रम किंवा अफवा टाळण्यासाठी, शैक्षणिक तसेच अशैक्षणिक सर्व बाबींशी संबंधित माहितीचा अधिकृत व प्रामाणिक स्रोत म्हणून पालकांनी शाळेच्या वेबसाइटवर अवलंबून राहावे. परिपत्रके आणि महत्त्वाच्या अद्यतनांसाठी कृपया खालील लिंकद्वारे शाळेची वेबसाइट नियमितपणे भेट द्या:

**[https://donbosconaigaon.org/academics.php](https://donbosconaigaon.org/academics.php)**

येथे क्लिक करा: Circulars → Non Academic

शाळेत शिस्तबद्ध, सुरक्षित आणि संरक्षित वातावरण राखण्यासाठी आपण देत असलेल्या सहकार्याबद्दल आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

आपले नम्र,

मुख्याध्यापक

Fr. Anthony